24 DEC 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उच्च शिक्षणात खुलेपणा आणणे आवश्यक

## डॉ. जगन्नाथ पाटील यांचे प्रतिपादन : नॅक मूल्यांकनाच्या बदललेल्या स्वरूपामुळे संस्थांनी पूर्ण क्षमतेने गुणवत्ता प्रदर्शन करावे

प्रतिनिधी
कोल्हापूर

नॅक मूल्यांकनाचे बदललेले स्वरुप म्हणजे भारतीय उच्चशिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्ता वर्धनासाठी अत्यंत विचारपूर्वक रचलेला चक्रव्यूह आहे. त्याला भेदण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी त्या तोडीची गुणवत्ताच प्रदर्शित करणे आवश्यक ठरणार आहे, असे सांगत विद्यार्थी समाधान सर्वेक्षण (स्टुडंट सॅटिस्फॅक्शन सर्व्हे) हा या नव्या मूल्यांकनातला अत्यंत महत्त्वाचा घटक असून जागतिक पातळीवर विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणाला शैक्षणिक संस्थेच्या मूल्यांकनात इतके महत्त्वाचे स्थान देणारी 'नॅक' ही पहिलीच संस्था तर भारत हा पहिलाच देश ठरला आहे, देशातील उच्चशिक्षणाच्या क्षेत्रांत जास्तीत जास्त खुलेपणा आणणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन 'नॅक'



(बंगळूर) चे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात शुक्रवारी 'नॅक' मूल्यांकनाच्या बदललेल्या स्वरुपाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. पाटील यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

'नॅक'ने भारतातील उच्चशिक्षण संस्थांच्या गुणवत्ता मूल्यांकनाचे निकष आणि स्वरुप हे मोठ्या प्रमाणावर बदललेले आहेत. त्यासंदर्भात डॉ. पाटील यांनी अत्यंत तपशीलवार माहिती दिली. ते म्हणाले, भारताच्या विविध भागांत अत्यंत टोकाच्या, परस्परविरोधी, परस्परभिन्न परिस्थिती असल्याचे दिसते. उच्चशिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. मात्र, भारतीय उच्चशिक्षणातील शहरी–ग्रामीण हा भेद लक्षात घेऊन त्यावर ठोस काम करण्याची गरज 'नॅक'ला वाटते. त्यामधून मूल्यमापनाचे नवे निकष निर्धारित करण्यात आले आहेत.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, उच्चशिक्षणासमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी या क्षेत्रात कार्यरत प्रत्येक घटकाने सज्ज राहण्याची गरज आहे. नॅकच्या नव्या मूल्यांकन पद्धतीत संबंधित संस्थेच्या 'बेस्ट प्रॅक्टीसेस'ना मोठे महत्त्व आहे. प्रत्येक संस्थेत अंगभूत अशा काही बेस्ट प्रॅक्टीसेस असतातच, 'नॅक'मुळे त्या समाजासमोरच नव्हे, तर देशासमोर सादर करण्याची संधी मिळते. या संधीचा प्रत्येक शिक्षण संस्थेने लाभ घेतला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक विद्यापीठाच्या आयक्यूएसी कक्षाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत यांनी केले. आभार कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्यासह संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थी उपस्थित होते.

### नॅकला सादर करावयाच्या कागदपत्रांचे प्रमाण ७० टक्के असेल

आजतागायत 'नॅक' समितीच्या भेटीचे साजरीकरण अधिक प्रमाणात होत असे. नव्या संरचनेत याला स्थान असणार नाही. यापुढील काळात शैक्षणिक संस्था 'नॅक'ला जी माहिती सादर करतील, तिच्या पुराव्यादाखल सादर करावयाच्या कागदपत्रांचे, प्रमाणपत्रांचे प्रमाण सुमारे ७० टक्के असेल. आणि ज्या प्रक्रियांचे डॉक्युमेंटेशन करणे शक्य नसते, (उदा. अभ्यासक्रमांची रचना व स्वरुप, टिचिंग–लर्निंग प्रक्रिया) अशांचे मूल्यांकन पिअर टीमच्या भेटीदरम्यान केले जाईल. विद्यार्थी समाधान सर्वेक्षण (स्टुडंट सॅटिस्फॅक्शन सर्व्हे) हा या नव्या मूल्यांकनातला अत्यंत महत्त्वाचा घटक असणार आहे, असेही डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 DEC 2017
Times of India

# 'Only quality can fetch NAAC grades'

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** National Assessment and Accreditation Council (NAAC) advisor Jagannath Patil said that only good quality infrastructure, education and feedback can assure a good NAAC grade for a college.

He was attending a seminar at the Shivaji University, Kolhapur (SUK). Patil said that assessment norms have been made tougher and it is impossible to manipulate them in any way.

He said that according to the needs of urban and rural academic institutions, the norms and guidelines of assessment have been changed.

He conceded that peer team visit had a lot of influence in earlier grading. However in the new norms only 20% of marks depend on peer visit.

He further said that information which the institutions submit to NAAC, will have to be backed by proper documentation.

Patil said, "We are the first country to give importance to student feedback during the assessment process. We call it student's satisfaction survey."

He added that now for an institution to score better in NAAC assessment, they have to take care of system generated score, student's satisfaction survey, and peer team visit.

Devanand Shinde, vice-chancellor of SUK said that NAAC's latest guidelines focus on the best practices of the institution and need to be followed.

Shinde added that NAAC assessment of an institution denotes standards of quality as set by the accreditation agency and whether the particular college is following it or not. If the college achieves the standard, NAAC's goal of quality education is fulfiled.

It may be noted that the National Assessment and Accreditation Council (NAAC) is an autonomous body established by the University Grants Commission (UGC) to assess and accredit institutions of higher education in the country.

24 DEC 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन, भाग-२' चे २ जानेवारीला प्रकाशन

कोल्हापूर
शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्राच्या वतीने महर्षी विठ्ठल शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त २ जानेवारीला रा. ना. चव्हाण लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन, भाग-२ या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ व व्याख्यान अशा संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ वा. हा कार्यक्रम होणार आहे. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. यावेळी प्रमुखपाहुणे म्हणून भारती अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ माणिकराव साळुंखे हे उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख वक्ते म्हणून प्रा. पुष्पा भावे या उपस्थित राहतील. कार्यक्रमाला डॉ. गो. मा. पवार, सुजाता पवार, निवृत्त एअर कमांडर अशोक शिंदे, रमेश चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे.


पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची 'ग्लोबल' भरारी

**कोल्हापूर : विजय पाटील**

शिवाजी विद्यापीठास सरते वर्ष सकारात्मक आणि आत्मविश्वास वाढवणारे ठरले. कारण केंद्र सरकारच्या महत्त्वकांक्षी उपक्रमाच्या बत्तीस संस्थांच्या शॉर्टलिस्टमध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश झाला. पदार्थविज्ञान विषयाच्या संशोधनात विद्यापीठाचा जगभर लौकीक आहेच. आता आंतराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता प्रकल्पात विद्यापीठाचा समावेश झाला आहे. एकूणच गुणवत्तेत विद्यापीठाची 'ग्लोबल' भरारी यंदा दिसून आली.

शिवाजी विद्यापीठाने पदार्थविज्ञान शाखांतील संशोधनात सातत्याने जागतिक पातळीवर शिक्कामोर्तब झाले आहे. यंदाही यामध्ये सरासरी कायम राहिली. जगभरातील पहिल्या शंभर विद्यापीठांमध्ये भारतातील एकही विद्यापीठ नाही. याचा विचार करून केंद्र सरकारने शैक्षणिक गुणवत्ता वाढीचा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये देशातील वीस विद्यापीठांची निवड करून त्यांना पाच वर्षांसाठी एक हजार कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे. या



**मागोवा २०१७**

उपक्रमातील शॉर्टलिस्टमध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे. एकप्रकारे विद्यापीठाच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब आहे.

यासह यंदा अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुका शांततेत पार पडल्या. या निवडणुकीत 'सुटा'ची पिछेहाट झाली तर विद्यापीठ विकास आघाडीने निर्विवाद सत्ता मिळवली. निवडणूक काळात 'सुटा'चे जिल्हाध्यक्ष प्रा. रघुनाथ ढमकले यांना 'सुटा'ने निलंबित केल्याने संघटनेतील बंड चांगलेच गाजले. 'सुटा'तील प्रस्थापित विरुद्ध नवनेतृत्वांच्यातील

- ग्रामीण शिक्षणक्षेत्राचे नेतृत्व
- नव्या कायद्याची अंमलबजावणी
- जागतिक दर्जाच्या नामावलीसाठी नामांकन
- अधिसभा निवडणूक शांततेत

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना संधी

*कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच सध्या मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी काम करण्याची संधी मिळाली. ही संधी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंना मिळाली असल्याने शैक्षणिक क्षेत्रात विद्यापीठाची विश्वासार्हता मोठी असल्याचे स्पष्ट आहे.*

धुसफूस यानिमित्ताने बाहेर आली.

यंदा एप्रिलपासून नव्या विद्यापीठ कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्याची सुरळीत अंमलबजावणी सुरू झाली आहे. एकूणच शैक्षणिक गुणवत्तेबाबत चांगले चित्र असताना दुसऱ्या बाजूला विविध प्रश्नांसाठी शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, माजी सैनिक आदींनी प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन केले. सकल मराठा संघटनेनेही बिंदूनामावलीनुसार कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याच्या मुद्द्यावर प्रशासनाला धारेवर धरले. यावर्षी प्र-कुलगुरू म्हणून डॉ. डी. टी. शिर्के यांनी पदभार स्वीकारला.

**जैवविविधतेत अव्वल**

विद्यापीठ परिसरात १२०० हून अधिक मोर असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले. जैवविविधतेच्या दृष्टीने ही दिलासादायक गोष्ट आहे. तसेच प्लास्टिकमुक्त परिसर ही संकल्पना प्रशासनाकडून यशस्वीपणे राबवली आहे.